शासकीय जमिनी महाविद्यालयांसाठी देताना लावावयाची सवलतीची किंमत/भाडेपट्टा.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: एलआरएफ.१०९३/प्र.क्र.६१/ज-१
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.
दिनांक:- २० जुलै १९९५.

वाचा - शासन निर्णय, क्रमांक : एलआरएफ.१०९२/प्र.क्र.८७/ज-१, दिनांक ३० जून १९९२.

शासन निर्णय
=========

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक:एलआरएफ.१०९२/प्र.क्र.८७/ज-१, दिनांक ३० जून १९९२ अन्वये शैक्षणिक संस्थांना शासकीय जमीन मंजूर करताना आकारावयाचे सुधारीत दर विहित केलेले आहेत. या आदेशामध्ये उच्च माध्यमिक विद्यालये तथा कनिष्ट महाविद्यालये यांना शासकीय जमीन मंजूर करताना कोणते दर लागू करावेत याबाबतचा स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे त्यांना निश्चित कोणते दर लागू करावेत याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, उच्च माध्यमिक विद्यालये तथा कनिष्ट महाविद्यालये यांना शासकीय जमीन मंजूर करताना उक्त निर्णयातील परिच्छेद क्रमांक १ [२] मधील उच्च शिक्षणासाठी विहित केलेले दर लागू करावेत.

२. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक प्र.क्र. ७९६/व्यय-९, दिनांक १४.७.१९९५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

कांचन विजयन

[ कांचन विजयन ]
कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.

RB.

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त,